महा मेट्रो

PUNE METRO

**महामेट्रो प्रशासनाकडून कोरोना-19 या विषाणूपासून बचाव करण्यासाठी मेट्रो कर्मचाऱ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या उपाययोजना**

पुणे,18.03.2020: महामेट्रो कोरोना या विषाणूपासून सर्व कर्मचारी सुरक्षित राहावे आणि सर्व कर्मचाऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी सर्व स्तरावर उपाययोजना करत आहेत. मेट्रो कर्मचाऱ्यांना निरोगी वातावरण मिळावे यासाठी महामेट्रो सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. यासाठी महामेट्रोने युद्ध पातळीवर महत्वाचे पाऊल उचललेले आहे .

1) लेबर कॅम्प या ठिकाणी कामगारांसाठी आरोग्य शिबिरे घेतली जात आहेत. कामगारांची संख्या जास्त आहे अशा सर्व कास्टिंग यार्डांवर बाहेरील लोकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. कास्टिंग यार्डमध्ये प्रवेश करणा ऱ्या सर्व व्यक्तींचे त्यांच्या शरीराचे तापमान तपासले जात आहे आणि कामाच्या आवारात प्रवेश करण्यापूर्वी त्यांना सॅनिटायझर्स आणि मास्क पुरविले जात आहे.

2) कोराणा या विषाणूच्या बाबतीत सर्व घ्यावयाची काळजी, माहिती सर्व कार्यालये आणि बांधकाम साइट्सवर आयोजित जागरूकता कार्यक्रमांद्वारे सर्वांना स्पष्ट केली जात आहे.

3) डॉक्टर आणि पॅरामेडिक्स हे काय करावे आणि काय करु नये या गोष्टींवर शिक्षण देत आहेत आणि त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी त्यांना उद्युक्त करीत आहेत. तसेच नियमितपणे कर्मचाऱ्यांची तपासणीही करीत आहेत.

4) आपल्या स्वतःचे आणि इतरांचे संरक्षण कसे करावे याविषयी सर्वांना शिक्षण देण्यासाठी कोविड 19 वरील प्रदर्शन फलक सर्व प्रमुख आणि मेट्रोच्या ऑफिस ठिकाणी लावण्यात आले आहेत.

5) सर्व कर्मचाऱ्यांना कोणत्याही कार्यालयात किंवा साइटमध्ये प्रवेश करण्यापूर्वी त्यांचे सॅनिटायझरने हात साफ केले जात आहे. त्यांना वारंवार साबण आणि पाण्याने हात धुण्याचा सल्ला दिला जातो.

6) सर्वांना मास्क घालण्यासाठी सांगितले जात आहे .

7) डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी केली जात आहे .

8) सर्व ऑफिसच्या ठिकाणी हँडशेक करु नये ही पॉलिसी लागू केली गेली आहे .

9) सर्व कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी साइट आणि कामगार शिबिरात डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली आहे.

10)कामाच्या ठिकाणी आणि राहत्या ठिकाणी आरोग्य आणि स्वच्छतेवर लक्ष दिले जात आहे.

11) सर्व कार्यालये, साइट्स येथे सर्व संमारभ बंद करण्यात आले आहे.

12) कामाच्या ठिकाणी प्रवेशद्वारावरील कर्मचाऱ्यांची तापाची तपासणी.

13) कोविड 19 च्या संबधित महिती देण्यात येणा-या व्यक्तींची नावे व त्यांच्या मोबाइल क्रमांकासह सर्व कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली आहे.

14) महा मेट्रो - पुणे सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी वचनबद्ध आहे आणि कोराणा हा विषाणू पासुन बचावण्यासाठी सर्व खबरदारी घेतली जाईल असे महामेट्रोच्या प्रशासनाकडून सांगितले आहे .

१५) महामेट्रोचे कामगार डेक्कन महाविद्यालय ग्राउंड , नाशिक फाटा , किवळे , वाघोली , कृषी महाविद्यालय व वनाज येथील लेबर कॅम्प मध्ये राहत असून त्यांची नियमित तपासणी करण्यात येत आहे. या सर्व ठिकाणी २४x७ तज्ञ डॉक्टरांची सोय करण्यात आली आहे. तसेच कामगारांना कोरोना संबधी संपूर्ण माहिती संगोष्टी द्वारे देण्यात आली आहे.

महामेट्रोने घेतलेल्या विविध उपाययोजनांमुळे "कोरोना" चा मेट्रोच्या कामावर प्रभाव पडलेला नाही किंवा कामाचा वेग मंदावलेला नाही.


18-Mar-2020 8:05:55 am
Shivajinagar
Pune
Maharashtra
NOTICE


18-Mar-2020 8:06:48 am
Shivajinagar
Pune
Maharashtra


18-Mar-2020 8:09:21 am
Unnamed Road
Ashok Nagar
Pune
Maharashtra


WASHROOMS